गोवा सरकार
माहिती आणि प्रसिध्दी खाते
पणजी-गोवा

वार्तापत्र

# 18 जून रोजी राज्यातर्फे गोवा क्रांती दिवस साजरा करणार

ता. 12 जून 2019
22 ज्येष्ठ 1941

18 जून रोजी गोवा क्रांतीदिवस साजरा करण्यासाठी गोवा सज्ज झाला आहे. राम मनोहर लोहिया यांनी 1946 साली पोर्तुगीजाविरूध्द लढा देण्यासाठी गोव्यातील लोकांना हाक दिली होती.

या कार्यक्रमानिमित्ताने राज्य सरकारने 18 जून रोजी सकाळी 8.45 वाजता कार्यक्रमाचे आयोजन केले असून राज्यपाल डॉ. श्रीमती मृदूला सिन्हा हुतात्मा स्मारकावर पुष्पांजली वाहून स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतीस आदरांजली वाहतील. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, गोवा विधानसभेचे सभापती श्री. राजेश पाटणेकर, मंत्रीगण, विरोधी पक्षनेते आणि स्वातंत्र्य सैनिक यावेळी पुष्पांजली वाहतील.

यावेळी बाल भवनचे गानपथक देशभक्तीपर गीते सादर करतील. त्याचप्रमाणे राज्य सरकारने मडगांव येथील लोहिया मैदानावर सकाळी 9 वाजता आणि फोंडा येथील क्रांती मैदानावर गोव्यातील स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

उपमुख्यमंत्री श्री. विजय सरदेसाई, मडगांव येथील लोहिया मैदानावर पुष्पांजली वाहतील. तर कला व संस्कृतीमंत्री श्री. गोविंद गावडे फोंडा येथील क्रांती मैदानावर पुष्पांजली वाहतील.

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/323